सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

मराठी भाषा विभाग

मंत्रालय

नागरिकांची सनद

<u>प्रस्तावना:-</u>

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये "मराठी भाषा विभाग" असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग स्थापन करण्याचा निर्णय दि.२४ जून, २०१० च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे. त्यानुसार स्वतंत्र मराठी भाषा विभाग स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून, नव्यान निर्माण करण्यात आलेल्या विभागामध्ये महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या अनुसूचीमधील सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या अखत्यारितील मराठी भाषेशी संबंधित विषय तसेच मराठी भाषा विषयक कामकाज पाहणारे भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ इ.कार्यालये/संस्था/मंडळ मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर निर्णयास अनुलक्षून स्वतंत्र मराठी भाषा विभागाच्या स्थापनेबाबतचे आदेश शासन निर्णय, सा.प्र.विभाग क्र.मभावा-२०१०/४५८/प्र.क्र.९५(भाग-२)/२०-ब, दि.२२ जुलै, २०१० अन्वये निर्गमित करण्यात आली आहे. याबाबतची अधिसूचना दि.२९ नोव्हेंबर, २०१० अन्वये निर्गमित करण्यात आली आहे. नवनिर्मित मराठी भाषा विभाग लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती पदक्त समिती शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.शप्रस-२०१०/प्र.क्र.११६/२०-ब, दि.१४ जुलै, २०१० व दि.१० ऑगस्ट, २०१० अन्वये स्थापन करण्यात आली आहे.

२. <u>मराठी भाषा विभागाची रचना</u>

मा.मुख्यमंत्री हे मराठी भाषा विभागाचे प्रभारी मंत्री आहेत. विभागासाठी सचिव (मराठी भाषा) हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वर्ग-१ चे ३ अधिकारी व वर्ग-२ चे ६ अधिकारी असून, एकूण ६ कार्यासनांमध्ये या विभागाकडील सर्व विषयांची विभागणी करण्यात आली आहे. (परिशिष्ट-१ सोबत जोडले आहे) तसेच विभागाचा संरचना तक्ता सोबत जोडला आहे. नवनिर्मित मराठी भाषा विभागामध्ये खालील विषयांचे कामकाज हाताळण्यात येते.

१) मराठी भाषा विभाग (खुद्द) शी संबंधित तसेच मराठी भाषेच्या विकासासंबंधी शासन स्तरावरील सर्व कामे.
२) भाषा संचालनालय व त्याचेशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय.
३) राज्य मराठी विकास संस्था व त्याचेशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय.
४) महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ व त्याचेशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय.
५) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व त्याचेशी संबंधित शासनस्तरावरील सर्व कामकाजाचे संनियंत्रण व समन्वय.
६) पाठयपुस्तके सोडून मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी कला या सर्व विषयांशी संबंधित उत्तम पुस्तकांना उत्तेजन देण्याकरिता पुस्तक निवड करणेबाबत. (पुस्तक निवड समिती) व तद्नुषंगिक बाबी.

**३.** कार्यपूर्तीचे वेळापत्रक

मराठी भाषा विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपूर्तीच वेळापत्रक परिशिष्ट-२ येथे सादर करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम ११ मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ट बाबी, लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, न्यायिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे, विधी विधानांशी संबंधित बाबी, मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इ.ना कार्यपूर्तीच्या वेळापत्रकातील स्तंभ क्र.३ येथील वेळापत्रकातून सूट राहील.

**४.** नियम / शासन निर्णय

या विभागाशी संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियम तथा शासन निर्णयाबाबतची माहिती www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर अद्ययावत करण्यात येते.

५. (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी परिच्छेद-३ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही

नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित सचिवांकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेलद्वारेही मांडता येतील.

(ब) <u>नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन</u>

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा मराठी भाषा विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

(क) <u>जनसामान्यांकडून सूचना</u>

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

६. <u>नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

मराठी भाषा विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. मराठी भाषा विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्याची राहील.

परिशिष्ट-२

कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| कार्यासन क्रमांक | विभागाकडून / कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (दालन क्रमांक व दूरध्वनी विस्तार क्रमांक) | सेवा विहीत कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| आस्थापना-१ | अ (आस्थापना)<br>१) मराठी भाषा विभागाच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी .<br>२) गोपनीय अभिलेख<br>३) अग्रिम मंजूर करणे (घरबांधणी/भविष्य निर्वाह निधी/मोटार/मोटार सायकल/संगणक इ.)<br>४) विभागात नवीन पदे निर्माण करणे / अस्थायी पदे पुढे चालू ठवणे, स्थायीकरणाचे प्रस्ताव सादर करणे.<br>५) ठेव संलग्न विमा योजना<br>६) विभागीय चौकशी<br>७) विभागातील कोणत्याही कार्यासनास विवक्षित वाटप न केलेल्या सेवाविषयक | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ | कक्ष अधिकारी,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७<br><br>अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड, | उप सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बाबी<br>८) विभागातील व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय / विभाग प्रमुखांचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार प्रदानाचे प्रस्ताव तपासून मान्यता देणे.<br>९) गृह व्यवस्थापन<br>१०) शासकीय वाहनासंदर्भातील बाबी<br>११) विभागातील अधिकारी /कर्मचारी यांना ओळखपत्र देणे तसेच शासकीय कामानिमित्त खाजगी व्यक्तींना तात्पुरते मंत्रालय प्रवेशपत्र देणे.<br>१२) मराठी भाषा विभागातील अधिकारी / कार्यासने यांनी शासकीय कामकाजासंबंधात केलेल्या खर्चाची - दूरध्वनी/शासकीय परिवहन सेवा/मंत्रालय उपहारगृह/इंधन/किरकोळ खर्चाची प्रतिपूर्ती /टॅक्सी प्रवास खर्च/हमालावरील खर्च/भविष्यनिर्वाह निधी खातेपत्रकासाठी पूर्वमुद्रित कागदाची खरेदी इ.संदर्भातील देयके अदा करणे.<br>१३) नागपूर अधिवेशनासंबंधातील व्यवस्था तसेच, अधिवेशन कालावधीत रेल्वे व विमानासाठी प्राथम्यपत्र.<br>ब (नोंदणी शाखा) | महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १) मराठी भाषा विभागात आलेले टपाल/नस्त्या (गोपनीय सह) स्वीकारणे / पाठविणे.<br>२) फ्रॅकिंग मशीन व तिकीटांचा हिशेब ठेवणे<br>३) मराठी भाषा विभागातील अभिलेख्याची नोंदणी<br>४) मराठी भाषा विभागाचे ग्रंथालय<br>५) विभागातील वाहन चालक / चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना गणवेश उपलब्ध करुन देणे<br>६) लेखन सामग्रीचा पुरवठा करणे<br>७) विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर थांबल्याबद्दल अतिकालिक भत्ता मंजूर करणे.<br>८) विभागातील यंत्र समग्रीचा दुरुस्ती व देखभाल दरकरार विषयक बाबी हाताळणे<br>९) नवीन फर्निचर बनवून घेणे व जुन्या फर्निचरची दुरुस्ती करणे.<br>१०) विधानमंडळ कामकाजाशी संबंधित मराठी भाषा विभागातील समन्वयाची कामे.<br>११) झेरॉक्स व चक्रमुद्रित प्रती काढण्याची व्यवस्था करणे. | | | |
| आस्थापना-२ | १) मराठी भाषा विभागातील अधिकारी / | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे | कक्ष अधिकारी, | उप सचिव, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (रोख शाखा) | कर्मचारी यांची वेतन देयके आहरण व संवितरण<br>२) देयकांच्या अनुषंगाने आवश्यक ती हिशेबांच्या नोंदवहया ठेवणे.<br>३) सेवापुस्तके अद्ययावत ठेवणे<br>४) खर्चाचा ताळमेळ घालणे.<br>५) गट ड कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे लेखे ठेवणे.<br>६) रोखशाखा - खर्च मेळाबाबत समन्वय<br>७) विभाग (खुद्द) अर्थसंकल्पीय अंदाज (सुधारित अर्थसंकल्पासह) व त्यानुषंगिक इतर सर्व बाबी व समन्वय.<br>८) दुरध्वनी व मोबाईल संबंधीच्या सर्व बाबी<br>९) विभागातील अधिकाऱ्यांना वृत्तपत्रे, नियतकालिके व प्रकाशने पुरविण्याबाबत. | बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७<br><br>अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| आस्थापना-३ (अर्थसंकल्प) | १) विभाग (खुद्द) व विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचे अर्थसंकल्पीय अंदाज (सुधारित अर्थसंकल्पासह) व तद्नुषंगिक इतर सर्व बाबी व समन्वय.<br>२) कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे<br>३) लोकलेखा समिती संबंधीचे कामकाज<br>४) विनियोजन लेखे अहवाल | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या | कक्ष अधिकारी,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | उप सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ५) प्रलंबित निरीक्षण अहवाल / परिच्छेद<br>६) नागरी अहवाल<br>७) महसूली जमा अहवाल<br>८) राज्यपाल / वित्त मंत्री यांचे अभिभाषण<br>९) विभागातील नियंत्रक अधिकारी यांची यादी तयार करणे व अद्ययावत ठेवणे.<br>१०) विनियोजन लेख्याबाबतची माहिती तयार करणे.<br>११) शासकीय कर्मचारी इत्यादिंना कर्ज फक्त निधीची उपलब्धता व विभागाच्या संबंधित कार्यासनाकडे वाटप. | स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | |
| भाषा-१ | भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या सर्व आस्थापना विषयक बाबी | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत | कक्ष अधिकारी,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७<br><br>अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला, | उप सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | |
| भाषा-२ | भाषा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे आस्थापनाविषयक कामकाज वगळून इतर सर्व कामकाज | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | कक्ष अधिकारी,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७<br><br>अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | उप सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| भाषा-३ | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे | कक्ष अधिकारी, | उप सचिव, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांचे आस्थापनाविषयक कामकाज वगळून इतर सर्व कामकाज. | बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम १०(१) मधील तरतूदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी आणि तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो ४ दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या नस्तीवर ४५ दिवसाच्या आत व दुसऱ्या विभागाची बाब अंतर्भूत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर ३ महिन्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७<br><br>अवर सचिव,<br>मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ | मराठी भाषा विभाग,<br>८ वा मजला,<br>नवीन प्रशासन भवन,<br>मादाम कामा रोड,<br>मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |

परिशिष्ट-१

मराठी भाषा विभाग

| सचिव | उप सचिव | अवर सचिव | कक्ष अधिकारी |
| --- | --- | --- | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| सचिव (मराठी भाषा) | उप सचिव<br>कार्यासन<br>आस्था-१, आस्था-२, आस्था-३, भाषा-१, भाषा-२, भाषा-३ | अवर सचिव<br>कार्यासन<br>आस्था-१, आस्था-२, आस्था-३, | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>आस्था-१<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| | | | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>आस्था-२<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| | | | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>आस्था-३<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| | | अवर सचिव<br>कार्यासन<br>भाषा-१, भाषा-२, भाषा-३ | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>भाषा-१<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| | | | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>भाषा-२<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |
| | | | कक्ष अधिकारी<br>कार्यासन<br>भाषा-३<br>८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.<br>(०२२) २२८३६८७७ |